# विनम्र श्रध्दांजली

हिंदुस्थान

# भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या काही आठवणी आणि मान्यवरांच्या प्रतिक्रिया...



महाराष्ट्रात सेना भाजपाच्या शासन काळात शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्याशी हितगुज करतांना अटलजी सोबत तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी



१९९५ साली महाराष्ट्रात शिवशाहीची सत्ता आल्यानंतर विजयी रॅलीत हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे व अटलजी



यवतमाळ येथे लोकसभेच्या प्रचारासाठी आले असतांना अटलबिहारी वाजपेयी यांच्यासोबत अरुणभाऊ अडसड



दिल्ली येथे एका वास्तूत अटलजींसोबत अरुण अडसड



परम श्रध्देय अटलजींचे १९६५ च्या यवतमाळ येथील सभेच्या वेळी स्वागत करतांना प.पू. श्री गजानन महाराज पुंडशास्त्री.



वर्धा येथे निवडणुकीदरम्यान अटलजींसोबत अरुण अडसड भाषण करतांना



भारतरत्न अटलजींसोबत अमरावतीचे तत्कालीन महापौर प्रवीण काशीकर

## स्व.अटलजींबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलेल्या भावना..

श्रद्धेय अटलबिहारी वाजपेयी...
अटल, अढळ, अचल, नित्य..
अटलबिहारी वाजपेयी...

केवळ कुण्या एका व्यक्तीचे हे नाव नाही, तर ते नाव आहे एका महासागराचे...

नावाप्रमाणेच अटल, अढळ, अचल...

ज्यांच्याकडे पाहून राष्ट्रभक्ती या शब्दाचा अर्थ कळतो, ज्यांच्याकडे पाहून राष्ट्राच्या सर्वांगिण विकासाच्या स्वप्नपूर्तीची अभिलाषा जागी होते, आदर्श, सत्यवचनी, कर्तव्य कठोर पण, तितक्याच निर्मळ मनाचा थोर नेता, आधुनिक युगातील एक महापुरूषाचे आज आपल्यातून असे निघून जाणे, मनाला अतिशय अतिशय वेदना देणारे आहे. आमचे थोरनेते, राष्ट्रपुरूष श्रद्धेय अटलजी यांचे आपल्यातून निघून जाणे, ही माझी वैयक्तिक हानी आहे! ज्या नेत्यांकडे पाहून आपण राजकारणाची पायरी चढलो, त्या आदर्शांपैकी श्रद्धेय अटलजी एक! लोकशाहीत विविध आयुधं वापरून समाजाची आणि समाजातील शेवटच्या घटकाची सेवा कशी करता येऊ शकते, याचा आदर्श वस्तुपाठ त्यांनी आपल्या प्रदीर्घ राजकीय आयुष्यातून घालून दिला. माझी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली...

आज माझ्या बालपणीच्या अनेक आठवणी डोळ्यापुढे तरळत आहेत. स्व. प्रमोदजी महाजन यांच्यासमवेत त्यांची झालेली पहिली भेट, त्यानंतर पुढे त्यांचे सातत्याने होत राहिलेले मार्गदर्शन आणि अगदी अलिकडे त्यांच्या निवासस्थानी झालेली भेट, हा सारा स्वप्नवत प्रवास. श्रद्धेय अटलजींच्या अशा अचानक निघून जाण्याने कधीही भरून न निघणारी एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे.



तन, मन, धनाने राष्ट्रासाठी अगदी सर्वस्व झोकून देणारे आपल्या सर्वांचेच श्रद्धेय अटलजी हे लाडके नेते. संसद असो की एखादी जाहीर सभा, श्रद्धेय अटलजींना ऐकण्यासारखा दुसरा ज्ञानानंद नाही. ज्ञानाचा महासागर, ओघवत्या वक्तृत्वाचे धनी, त्यागाच्या तपस्वी मूर्तीचे जाणे अतिशय वेदनादायी आहे. कधीही न भरून निघणारी ही हानी आहे. श्रद्धेय अटलजी त्यांच्या विचार, मार्गदर्शनाच्या रूपाने आम्हा सर्वांना सतत प्रेरणा देत राहतील. केवळ गतकाळातील नाही, तर येणार्या अनेक पिढयांचेही ते मार्गदर्शक असतील. या राष्ट्रऋषीला माझे कोटी कोटी वंदन. या दु:खातून बाहेर पडणे किंवा त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून काढणे अशक्य आहे! श्रद्धेय अटलजी हे केवळ भाजपाचे नाही, तर या देशाचे सर्वोच्च नेते होते. ज्या मोजक्या नेत्यांना जगभर आदर-सन्मान प्राप्त झाला, त्यातील अटलजी एक. विश्वमान्यतेच्या अटलजींचे नेतृत्त्व सर्व राजकीय पक्षांमध्ये सुद्धा सर्वमान्य होते. एक विशाल हृदयाचा, मोठ्या मनाचा नेता सदैव आपल्यासोबत असावा, अशीच आम्हा सर्वांची इच्छा. पण, नियती कधीच कुणाचे ऐकत नाही. आज जेव्हा भारताच्या परमवैभवाचा प्रवास अतिशय गतीने सुरू आहे, त्या काळात या परमवैभवाच्या प्रवासाचा पाया, ज्यांनी रचला ते आपल्यात असते तर त्यापेक्षा आनंदाचा दुसरा क्षण राहिला नसता.

पण, नियतीला ते मान्य नाही.

अटलजी एका कवितेत म्हणतात,

ठन गई।
मौत से ठन गई।
मै जी भर जिया, मै मन से मरूँ
लौटकर आऊँगा, कूच से क्यों डरूँ?

अटलजी आपल्यात नाहीत, हे सत्य स्वीकारताना मन कठोर करावेच लागेल. भारतीय जनता पार्टीच्या देशभरातील प्रत्येक कार्यकर्त्याच्या, अटलजींवर ज्यांनी नि:स्सिम प्रेम केले, ते या देशातील तमाम नागरिकांच्या दु:खात मी सहभागी आहे. एकमेकांना धीर देण्याच्या पलिकडे आपल्या हातात तरी काय आहे?

अटल, अढळ, अचल असलेले हे नेतृत्त्व नित्य आपल्यासोबत राहील, विचारांच्या रूपाने, दिशादर्शकाच्या रूपाने, मार्गदर्शकाच्या रूपाने...

माझी भावपूर्ण श्रद्धांजली...

**देवेंद्र फडणवीस**
**मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य**

## देशाने एक प्रतिभावान व्यक्तीमत्व गमावले - खा.भावना गवळी

अटलबिहारी वाजपेयी यांच्या निधनाने देशातील एक प्रतिभावान व्यक्तिमत्व लोप पावले आहे. देशाला उज्वल भविष्य देण्याचे त्यांचे प्रयत्न नेहमी स्मरणात राहतील. पक्षापेक्षा देशाला अधिक महत्व देणारा नेता म्हणून म्हणून त्यांची ख्याती होती. लोकसभेत त्यांच्यासोबत काम करण्याची संधी मला मिळाली. त्यांचे विचार मी प्रत्यक्ष ऐकले आहे. हे मी माझे भाग्य समजते. रक्षाबंधनाला त्यांना मी राखी सुध्दा बांधली आहे. कविमनाच्या, प्रतिभावान अशा श्रेष्ठ अटलजींच्या निधनाची वार्ता कळ्ताच खूप दुख झाले. जगात असे काही व्यक्ती असतात की ते शरीराने जरी संपले तरी त्यांचे विचार मात्र अनंतकाळ पर्यन्त टिकून राहतात. अटलबिहारी वाजपेयी सुध्दा अशातीलच एक व्यक्तिमत्व आहे ज्यांचे विचार देशाला भविष्यात सुध्दा दिशादर्शक ठरतील, असे मला वाटते. देव त्यांच्या आत्म्यास शांती देवो अशी ईश्वरचरणी प्रार्थणा करते.

## भाजपाचे भीष्मपितामह हरपले



स्व. अटलबिहारी वाजपेयी भाजपाचे भीष्मपितामह होते. त्यांच्या निधनाने भाजपच नव्हे तर संपुर्ण देशाचे प्रचंड मोठे नुकसान झाले आहे. अजातशत्रू वाजपेयींजीमुळे देश विकासाकडे वाटचाल करीत होता. त्यांच्या कार्यकाळातील निर्णय व त्यावरील अंमलबजावणीमुळे देशाने अनेक यशाची शिखरे पादाक्रांत केली आहे. पोखरण येथील अनुचाचण्यांचे परीक्षण करतांना त्यांनी अमेरीकेच्या गुप्तहेर संस्थेला साधी भनक सुध्दा लागू दिली नव्हती. महाशक्ती असणाऱ्या अमेरीकेला त्यांनी मोठी चपराक दिली होती. जाज्वल्य देशप्रेमाचे रुप असणारे स्व. वाजपेयीजी खरे देशभक्त होते. त्यांच्या निधनाने देशाची हानी झाली आहे, अशी प्रतिक्रीया पालकमंत्री प्रवीण पोटे यांनी दिली.

**प्रवीण पोटे, पालकमंत्री**

## उत्तुंग व्यक्तीमत्व हरपले : आ.डॉ. सुनील देशमुख



देशाचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजेपयी यांच्या निधनाने देशातील एक उत्तुंग व्यक्तीमत्व हरपले आहे. राजकीय कारर्कीदीत त्यांनी सर्व जाती धर्मातील नागरिकांशी नाळ जोडली होती. देश अखंडीत राहून विकास व्हावा हाच त्यांचा ध्यास होता. स्व.अटलबिहारी वाजपेयी यांच्या निधनाने देशातील राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. मोठे व सहृदयी व्यक्तीमत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. त्यांच्या जाण्याने राजकीय क्षेत्रच नव्हे तर सर्वच क्षेत्राला जबर धक्का बसला आहे. त्यांच्या निधनाने देशाचे मोठे नुकसान झाले असल्याची प्रतिक्रिया आमदार डॉ. सुनील देशमुख यांनी दिली.

## अटलजींनी देशाला नेतृत्व दिले



देशाचे माजी पंतप्रधान व भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांचे आज निधन झाले, त्यांच्या निधनाने देशाची मोठी हानी झाली आहे. ते उत्कृष्ट कवी, लेखक होते. सर्व देशांसोबत त्यांचे अतिशय चांगले संबंध होते, भारताच्या राजकारणाला त्यांनी दिशा देण्याचे कार्य केले. कौटुंबिक राजकारणाचा वारसा नसलेल्या अटलजींनी भारताचे नेतृत्व केले, भारत देश सक्षम होण्यासाठी त्यांनी मोलाची कामगिरी बजावली. त्यांच्यामुळे भारताच्या राजकारणाची दिशा बदलली.मोर्शी – वरुड विधानसभा मतदार संघाच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

**– आ.डॉ.अनिल बोंडे**
**मोर्शी – वरुड विधानसभा मतदार संघ.**

## प्रचंड आत्मविश्वास पडद्याआड : अनंत गुढे



माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी प्रचंड आत्मविश्वास असणारे व्यक्तीमत्व होते. त्यांच्या जाण्याने प्रचंड आत्मविश्वास पडद्याआड गेल्याची प्रतिक्रिया माजी खासदार अनंत गुढे यांनी दिली आहे. अनंत गुढे यांनी अटलबिहारी वाजपेयी यांच्या अमरावती भेटीची आठवणीला उजाळा दिला. जोग चौक येथे आले असतांना त्यांनी रामायणाचा दाखला दिला होता. प्रभू रामचंद्राचा वनवास राहू शकत नाही तर भाजपचा कसा राहणार असे सांगून त्यांनी भाषण दिले होते. संसदेतील त्यांच्या भाषणाला सभागृह खच्चून भरले असायचे. आम्ही सर्व आर्वजून त्यांचे भाषण ऐकत होतो. आपण खासदार असतांना त्यांना अनेकदा भेटलो होतो. वाजपेयी यांच्या निधनाने देशाला धक्का बसल्याचे अनंत गुढे यांनी म्हटले आहे.

## अजातशत्रूत्व लोप पावले : किशोर बोरकर



स्व. अटलबिहारी वाजपेयी यांनी पंतप्रधान असतांना ते भाजपचे नव्हते. सर्व देश त्यांचा व देशाचे ते नेता झाले होते. त्यांची छबी सर्वसामान्यांमध्ये स्वच्छ प्रतिमेची होती. प्रत्येक पक्ष व त्यातील नेते, कार्यकर्ते त्यांना आदर व सन्मान करीत होते. अजातशत्रू स्व. वाजपेयी यांच्यामुळे देश एका मोठ्या नेत्याला मुकला असल्याची प्रतिक्रिया शहर कॉंग्रेसचे अध्यक्ष किशोर बोरकर यांनी दिली आहे.

## देशाचे मोठे नुकसान : सुरेखा लुंगारे



अटलबिहारी वाजपेयी यांच्या निधनाने देशाचे मोठे नुकसान झाले आहे. ते कवी मनाचे कणखर हृदयाचे, धीरोदात्त, कणखर स्पष्टवक्ते, लोकशाही व्यवस्थेचा आदर्श होते. यामुळे युगपुरुषाचा अंत झाला आहे. संघ परिवारातील ज्येष्ठ सदस्य व राजकारणातील भिष्म पितामह अजातशत्रू होते. अतिशय लोकप्रिय असणाऱ्या राष्ट्रनेत्याच्या जाण्याने निर्माण झालेली मोठी पोकळी कधीच भरू निघू शकत नाही. सहा दशके लोकसभेचे सदस्य राहीलेले, देशाच्या अस्मितेला जगासमोर मांडणारे ते नेते होते. त्यांच्या जाण्याने देशावर दु:खाचा डोंगर कोसळला असल्याची प्रतिक्रिया मनपा झोन सभापती व उपाध्यक्ष सुरेखा लुंगारे यांनी दिली आहे.

## अजातशत्रू नेतृत्व हरवले - शिवराय कुळकर्णी

माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी हे भारतीयता, राष्ट्रीयता, मानवता, सहृदयता आणि उदात्तता अशा अनेक पैलूंचे एक रूप आहे. आपल्या जीवनात त्यांनी कायम देशहित सर्वोच्च मानले. याची जाणीव त्यांच्या समर्थकांनाच नाही, तर विरोधकांनाही आहे. म्हणूनच अटलजींचे वर्णन खर्या अर्थाने अजातशत्रू असेच केले पाहिजे, अशी भावपूर्ण श्रद्धांजली भाजपाचे प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी यांनी व्यक्त केली आहे.

आयुष्यातील अर्धशतक त्यांची वाणी या देशाला संमोहित करीत होती. या सरस्वतीपुत्राला ऐकण्यासाठी सामान्य लोकांची धाव तर होतीच. मात्र, बुद्धिजीवी आणि तत्सम समाजाच्या वरच्या स्तरात मानल्या जाणार्या लोकांनाही त्यांचे तेवढेच आकर्षण होते. अटलजी सत्तेत आल्यावर मोठे झालेले नाहीत, तर आपल्या कर्तृत्वाने त्यांनी आपल्या संघर्षमय काळातही स्वतःचे अढळ स्थान निर्माण केले होते. कार्यकर्ता, खासदार, नेता, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष पद, विरोधी पक्ष नेता, परराष्ट्रमंत्री आणि नंतर पंतप्रधान अशा सर्व जीवन प्रवासातील जबाबदारयांना अटलजींनी न्याय दिला. कवीमनाचा हळवा, संवेदनशील मात्र प्रसंगी राष्ट्रहितासाठी कारगिल युद्धात गनिमाला पराभवाची धूळ चारणारा थोर नेता आपण आज गमावला असल्याचे शिवराय कुळकर्णी म्हणाले.

## अभिवादन श्रद्धांजली

भारताच्या इतिहासातील अर्वाचीन सांप्रत काळातील कार्यरत आदर्शमूर्ती, आदर्श स्वयंसेवक व भारतीय राजकारणातील भीष्माचार्य श्रद्धेय अटलबिहारी वाजपेयी आज भारतमातेच्या श्रीचरणी निर्वाणभूत समर्पित झाले हे ऐकून देव देश धर्म क्षेत्रातील करोडो कर्मतपस्वी आणि समस्त भारतवासीयांचा एक आत्मिक आधार हरपला याचे दुःख झाले आहे.भारताच्या भविष्यकाळाची जी सुवर्णस्वप्ने आम्ही आज पाहतो आहे त्याला कारण राष्ट्रीय -सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात मा.अटलजींनी केलेली आजीवन तपश्चर्या आहे.जन्मजात निर्मलता आणि आयुष्यातील अजातशत्रूता आणि त्याचबरोबरच मन-वचन आणि कर्माची तेजस्विता हे अटलजींच्या जीवनाचे ऋषीसमान वैशिष्ट्य होते.कै अटलजींच्या निधनाने झालेली राष्ट्रीय हानी कधीही भरून न निघण्यासारखी आहे.

आज आमच्याजवळ आहे ते अटलजींचे चरित्र, त्यांचे चारित्र्य व त्यांचे विचार.यांच्या आधाराने मा अटलजींना अपेक्षित अशा देशाची निर्मिती करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.भारतातील समस्त साधू-संत परिवारातर्फे कै अटलजींना अभिवादनपूर्वक श्रद्धांजली.

**स्वामी जितेंद्रनाथ**
**श्रीनाथ पीठाधीश, श्रीनाथ पीठ, देवनाथ मठ**
**अंजनगाव सुर्जी**